वर्ष - 8 । अंक - 202
UDYAM-MH-26-0158827 TM
# महाईन्यूज
अर्थसंकल्प
रविवार, दिनांक
2 फेब्रुवारी 2025
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# थोडी खुशी थोडा गम!

**। नवी दिल्ली ।महाईन्यूज**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प कृषी क्षेत्रासाठी वल्गना आणि घोषणांचा पाऊस ठरला आहे. पोकळ घोषणा आणि मोठ्या मोठ्या वल्गना याच्या व्यतिरिक्त अर्थसंकल्पात काहीही नाही. किसान क्रेडिट कार्ड 3 लाखांवरून 5 लाखावर केलं. मात्र, शेतकऱ्याचं कर्ज वाढवून काय उपयोग? असा सवाल उपस्थित करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी अर्थसंकल्पावर प्रश्न चिन्ह उपस्थित केला आहे. किसान क्रेडिट कार्ड 3 लाखांवरून 5 लाखावर केलं.**



दुग्ध व्यवसाय अडचणीत असतानाही अर्थसंकल्पात भरीव तरतूद नसल्यानं यंदाचा अर्थसंकल्प पश्चिम महाराष्ट्रासाठी निराशाजनक असल्याचं मत थायलंड देशाचे वाणिज्य सल्लागार आणि गोकुळचे संचालक डॉ. चेतन नरके यांनी व्यक्त केलं. चामड्याच्या वस्तू निर्मितीसाठी केंद्र सरकारने योजनेची तरतूद केली असून असून यातून 22 लाख नव्या रोजगाराची निर्मिती होणार आहे. तर कोल्हापूर चपलचे व्यावसायिक आदित्य कदम यांनी अर्थसंकल्पातील तरतुदीबद्दल समाधान व्यक्त केलंय. मात्र, या योजना कारागीर आणि व्यावसायिकांपर्यंत पोहोचायला हव्यात अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तर साखर उद्योगाच्या दृष्टिकोनातूनही हा अर्थसंकल्प आर्थिक किफायतीच्या दृष्टीने जादा प्रमाणात अपेक्षा भंग करणारा आहे. तसेच अप्रत्यक्ष तरतूदींचा तर काही प्रमाणात होणार फायदा विचारात घेतल्यास साखरपट्ट्यासाठी अर्थसंकल्प थोडी खुशी थोडा गम असल्याचं मत साखर उद्योगातील तज्ञ पी.जी. मेढे यांनी व्यक्त केला.

## निराशाजनक अर्थसंकल्प

रासायनिक खताच्या वाढत्या किंमती नियंत्रित करण्यासाठी खतावरील सबसिडीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे असं दिसत नाही. उत्पादन खर्च वाढत आहे आणि यावर नियंत्रण करण्यासाठी काहीही उपाययोजना केल्या नाहीत. देशातील शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करायचं असेल तर हमीभावाचा कायदा करून द्यायला हवा अशी मागणी खासदार राजू शेट्टी यांनी केली.



अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या योजना नेमक्या कोणासाठी आणि कशासाठी आहेत हे कळत नाही. साखर उद्योगासाठी काहीही केलं नाही. शेतीच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प अत्यंत निराशाजनक असल्याचं राजू शेट्टी म्हणाले.




## स्वस्त झाले

36 जीवनावश्यक औषधांना करामध्ये सूट जाहीर झाली आहे. कॅन्सरची औषधं स्वस्त होणार आगहे. कॅन्सरच्या 36 औषधांवरची कस्टम ड्युटी हटवली आहे.

LED स्वस्त





भारतात बनवलेले कपडे

मोबाइल फोन बॅटरी





बूट

## महाग झाले

इंटरॲक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्लेवरील सीमा शुल्क १० टक्क्यांवरून २० टक्के करण्यात येणार आहे. यामुळे फ्लॅट टीव्हीसारख्या वस्तूंची किंमत वाढेल.



विणलेले कपडे

## अर्थसंकल्पातील निरिक्षण

**1 हे असणार आव्हान**
आर्थिक विकासातील घसरण, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत कमकुवत झालेला रुपया, उत्पादनांच्या मागणीत झालेली घट

**2 सर्वेक्षणातून चित्र**
देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) 4.5 टक्क्यांच्या खाली आणण्याच्या वित्तीय लक्ष्यावर सरकार टिकून राहण्याची अपेक्षा आहे.

**3 जीएसटी संकलनात वाढ**
जीएसटी संकलनात जो 10.62 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. धोरणात्मक सुधारणा आणि आर्थिक स्थैर्यासाठी सरकारचे प्रयत्न.

**4 वैद्यकीय क्षेत्राला दिलासा**
देशात येत्या 3 वर्षांमध्ये सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर्सची स्थापना केली जाईल.

## महिलांसाठी काय?

सरकार 10 हजार कोटी रुपयाचं योगदान देऊन स्टार्टअप्ससाठी फंडची व्यवस्था करेल. सरकार पहिल्यांदा पाच लाख महिला, एससी आणि एसटी उद्योजिका घडवण्यासाठी 2 कोटी रुपये कर्ज देईल. महिलांना विना गॅरेंटी सहज अटींवर लोन मिळेल. जेणेकरुन त्यांना छोट्या आणि मध्यम आकाराचा व्यवसाय सुरु करता येईल.

## शेतकऱ्यांसाठी काय?

बजेटमध्ये शेतकरी क्रेडिड लिमिट 3 लाखावरुन वाढवून 5 लाख करण्याची घोषणा करण्यात आली आहे. मंत्री निर्मला सीतारमण यांनी सांगितलं की, यूरिया उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी सरकार बंद पडलेले 3 यूरिया प्लांट पुन्हा सुरु केलेत. यूरिया पुरवठा वाढवण्यासाठी आसामच्या नामरुप येथे 12.7 लाख मॅट्रिक टन वार्षिक क्षमतेचा प्लांट लावला जाईल.

## कामगारांसाठी काय?

ऑनलाइन प्लेटफॉर्मवर काम करणाऱ्या कामगारांना ई-श्रम पोर्टलवर रजिस्टर करुन ओळखपत्र देण्यात येईल. पीएम जन आरोग्य योजनेतंर्गत आरोग्य सुविधा दिली जाईल. जवळपास 1 कोटी गिग कामगारांना याचा लाभ मिळेल. महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, मार्केटिंग सपोर्ट आणि सरकारी योजनांची जोडण्याची संधी दिली जाईल.

## मध्यमवर्गीय किती टक्के?


पीपुल रिसर्च ऑन इंडियाज कंज्यूमर इकोनॉमीच्या एका रिपोर्टनुसार देशाची राजधानी दिल्लीत 67 लोक मध्यमवर्गीय आहेत. हा 2022 सालचा रिपोर्ट आहे. पीपुल रिसर्चनुसार संपूर्ण देशात दिल्लीत सर्वात जास्त मध्यमवर्गीय आहेत. दिल्लीमध्ये राहणाऱ्या मिडल क्लासच वर्षाच उत्पन्न 5 लाख ते 30 लाखादरम्यान आहे.

# पुण्यात वाढताहेत GBS मृत्यू!

## जीबीएसचा राज्यातील इतर भागातही प्रसार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील जीबीएसने चिंता वाढवली आहे. पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) झालेल्या तिसऱ्या रुग्णाचा मृत्यू झाला आहे. राज्यातील चौथ्या रुग्णाचा मृत्यू आहे. 'पुण्यानंतर राज्यातील इतर भागातही रुग्ण वाढत आहे. नागपुरातही जीबीएसचे रुग्ण वाढत आहेत. रुग्णसंख्या आठवर पोहोचली आहे. पुण्यातील सध्याच्या उद्रेकाचे प्रमुख कारण मोठ्या लोकसंख्येसाठी दूषित पाण्याचे स्रोत असू शकते.**



पुण्यानंतर आता राज्यातील इतरही जिल्ह्यात जीबीएसचे रुग्ण आढळून येत असल्याने आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. पुण्यातील नांदेड परिसरातील 60 वर्षीय ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला आहे. पुण्यातील नांदेड परिसरात अनेक रुग्ण हे जीबीएस बाधित आहेत. त्यातील एकाचा मृत्यू झाला आहे. पुण्यात जीबीएस बाधित हा तिसरा रुग्ण आहे. त्यांना रक्तदाबाचा त्रास होता. त्यामुळे काही दिवस पुण्यातील खासगी रुग्ण्यालयात उचार सुरु होते. त्यांची प्रकृती अधिक बिघडल्यानंतर कुटुंबाने त्या महिलेला ससून रुग्णालयात दाखल केले होते. ससून रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

### पुण्यात का वाढले प्रकरणे?

पुण्यात जीबीएसची प्रकरणे का वाढली त्यासंदर्भात कन्सल्टंट-न्यूरोलॉजी डॉक्टर निखिल जाधव यांनी बिझनेस स्टँडर्डला सांगितले की, भारतात GBS प्रकरणे फक्त शरद ऋतूमध्येच दिसतात.

### नागपुरात रुग्ण वाढले

पुण्यानंतर राज्यातील इतर भागातही रुग्ण वाढत आहे. नागपुरातही जीबीएसचे रुग्ण वाढत आहेत. रुग्णसंख्या आठवर पोहोचली आहे. शहरातील एका खासगी रुग्णालयात जीबीएसच्या आणखी एका रुग्णांची नोंद झाली आहे. जीबीएसच्या ५६ वर्षीय रुग्णाने केअर रुग्णालयात उपचार घेतले होते. बरे वाटल्यानंतर त्याला सुट्टी दिली गेली. नागपूर जिल्ह्यात सध्या पाच जीबीएस रुग्ण दाखल आहेत. २०२४ मध्ये नागपूरात ५६ रुग्ण आणि तीन मृत्यू झाला. जीबीएसचा प्रादुर्भाव पहिल्यांदा चीनमध्ये दिसून आला. पुण्यातील सध्याच्या उद्रेकाचे प्रमुख कारण मोठ्या लोकसंख्येसाठी दूषित पाण्याचे स्त्रोत असू शकते. डॉक्टरांकडून त्वरित उपचार घेतल्यास हे रुग्ण बरे होतात. लक्षणे दिसू लागल्यानंतर 5 ते 7 दिवसांत उपचार सुरू करणारे रुग्ण नंतर निरोगी होतात. सध्याच्या उद्रेकाचे आणखी एक कारण म्यूटेंट वेरियंट असू शकतो. जीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेचा वैद्यकीय विभाग सतर्क झाला आहे. महापालिकेच्या दोन रुग्णालयात विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली. सांगलीत गुइलेन बॅरी सिंड्रोम रुग्णांची संख्या सहावर गेली आहे.

---

# अनधिकृत बांधकामांचा प्रश्न; कारवाईला 7 फेब्रुवारी पर्यंत स्थगिती

## PCMC: चिखली कुदळवाडीतील अतिक्रमण कारवाई थांबवण्यासाठी तब्बल 48 याचिका दाखल!

। पिंपरी- चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवरील कारवाईला व्यावसायिकांनी जोरदार विरोध केला असून, कारवाईविरोधात व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकांवर 14 फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. असे असतानाच गुरूवारी (दि.30) व्यावसायिकांनी तब्बल 48 याचिका दाखल केल्या आहेत.**




दरम्यान अनधिकृत बांधकामे काढून घेण्यासाठी प्रशासनाने सहा दिवसांची मुदत दिली असून 7 फेब्रुवारीपासून कारवाईला सुरूवात केली जाईल, असा पवित्रा महापालिकेने घेतला आहे. दुसरीकडे ही कारवाईच होऊ नये, यासाठी व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे न्यायालय काय भूमिका घेते यावर देखील कारवाईचे भवितव्य अवलंबून आहे.

अनधिकृत भंगार गोदामे, वारंवार लागणाऱ्या आगीमुळे चिखली, कुदळवाडी परिसर आगीचा हॉटस्पॉट झाला असून वायू व ध्वनिप्रदुषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदाम तसेच, हॉटेल, बेकरी, पत्राशेड, वर्कशॉप अशा अनधिकृत असलेल्या पाच हजार अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा दिल्या बजाविल्या होत्या.15 दिवसांत अनधिकृत पत्राशेड बांधकाम काढून घ्यावे. अन्यथा बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या पथकाकडून ते पाडण्यात येईल,असा इशारा दिला होता.

अनधिकृत गोदामे, पत्राशेड, बांधकामे हटवण्यासाठी महापालिकेने गुरूवारी (दि.30) कारवाई करण्याचे नियोजन केले होते. मात्र, या कारवाईविरोधात व्यावसायिक रस्त्यावर उतरले. त्यामुळे कारवाई न करताच महापालिकेचे पथक माघारी परतले. शुक्रवारी (दि.31) कारवाई होऊ नये, यासाठी सुमारे चार हजारपेक्षा जास्त व्यावसायिकांनी एकत्र येऊन कुदळवाडीत रस्त्यावरच बैठक घेत महापालिका प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी व्यावसायिकांची समजूत घालून महापालिकेत बैठकीसाठी प्रतिनिधींनी यावे, अशी विनंती केली. त्यानंतर महापालिकेत शहर अभियंता मकरंद निकम, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर, क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे आणि पाच ते सहा व्यावसायिकांची बैठक झाली.या बैठकीतही व्यावसायिकांनी तुर्त अतिक्रमण कारवाई करू नये, आम्हाला सहा महिन्यांची मुदत द्यावी, अशी मागणी केली. मात्र, यावर महापालिका अधिका-यांनी सहा दिवस कारवाईला स्थगिती दिली. 7 फेब्रुवारीपासून अतिक्रमणांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट शब्दांत सांगितले.

### कारवाईविरोधात व्यावसायिक उच्च न्यायालयात...

अतिक्रमण कारवाईविरोधात व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकांवर 14 फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. असे असतानाच गुरूवारी (दि.30) व्यावसायिकांनी तब्बल 48 याचिका दाखल केल्या आहेत.

> “ व्यावसायिकांबरोबर बैठक झाली. अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढण्यासाठी सहा दिवसांची मुदत दिली. मुदत संपल्यानंतर 7 फेब्रुवारीपासून कारवाई सुरू केली जाईल. सध्यःस्थितीत आरक्षित जागेच्या अतिक्रमणांवरील कारवाई सुरूच राहणार आहे.
>
> **–मनोज लोणकर,** उपायुक्त, अतिक्रमण विभाग.

## कामगार, महिला, सर्वसामान्यांना दिलासा

# “कॉमन मॅन” केंद्रीत अर्थसंकल्प!

### पिंपरी-चिंचवडमधील मान्यवरांच्या प्रतिक्रिया : अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याचा विश्वास

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा यंदाचा अर्थसंकल्प कामगार, महिला, सर्वसामान्यांना दिलासा देणारा आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. हा मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कर सवलत दुप्पट केली असून ५० हजारांवरून एक लाख रुपये केले आहेत. त्यामुळे कामगार, महिला सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा अर्थसंकल्प आहे, अशा प्रतिक्रिया महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी दिल्या आहेत.**



एससी, एसटीच्या महिला उद्योजकांसाठी विशेष कर्ज योजना आणली जाणार आहे. पहिल्यांदाच उद्योजक होणाऱ्या महिलांना दोन कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज मिळण्याची तरतूद केली जाणार आहे. ३६ जीवरक्षक औषधे पूर्णपणे करमुक्त केली आहेत. वैद्यकीय उपकरणे आणि कर्करोगाची औषधे स्वस्त होतील. गरीब, युवा, अन्नदाता व नारी या चार घटकांच्या प्रामुख्याने सक्षमीकरणावर भर दिला आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालनासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला एमयुटीपी तीन प्रकल्पासाठी १४६५ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.



महायुती सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. हा मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा आहे. सरकारने अर्थसंकल्पात सोन्यावरील आयात शुल्क दहा टक्के कमी करण्याची घोषणा केली. त्यामुळे परदेशातून सोने आयात करणे दहा टक्के स्वस्त होईल. सरकारने इंटरॲक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्लेवरील शुल्क दहा टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने घेवून जाणारा सर्वंकष असा आजचा केंद्रीय अर्थसंकल्प आहे.

**- श्रीरंग बारणे,**
खासदार, मावळ लोकसभा.



पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टी महायुतीच्या केंद्र सरकारने देशातील सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांना दिलासा देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्रीय अर्थमंत्री मा. निर्मला सितारामण यांनी 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. सरकारने ३६ पेक्षा अधिक जीवनावश्यक औषधांवरील मुलभूत सीमा शुल्कात सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. . शेती, उत्पादन, रोजगार, सूक्ष्म, मध्यम आणि लघू उद्योग, ग्रामीण भागाचा विकास आणि संशोधन या क्षेत्रावर भर देण्यात आला आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार.. म्हणजे मोदी सरकार! हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



नव भारताच्या विकासाला गती देणारा , सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना सक्षम करणारा आणि आर्थिक समृद्धीला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे. गरीब, तरुण, शेतकरी आणि महिलांच्या सशक्तीकरणासाठी घेतलेल्या निर्णयांचे मनःपूर्वक स्वागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सादर केलेल्या या दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्पामुळे देशाच्या प्रगतीला मोठी चालना मिळणार आहे.

**- शंकर जगताप,** आमदार, चिंचवड



देशातील शंभर जिल्ह्यांमध्ये धनधान्य योजना सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना अधिक विकासाची संधी मिळेल. तूर उडीद आणि मसूर डाळींसाठी सहा वर्ष विशेष अभियान राबवल्यामुळे शेतकरी वर्गाला चांगला आधार प्राप्त होणार आहे. .अनुसूचित जाती जमातींसाठी पादत्राणे आणि चामड्यासाठी उद्योजक म्हणून चांगली संधी निर्माण होणार आहे. मागासवर्गीय महिलांसाठी विशेष योजना आणल्याने हा समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.

**-अमित गोरखे,** आमदार, विधान परिषद.



देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी देशाचा २०२५-२६ वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करताना शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या विशेष तरतूदी स्वागताहार्य आहेत. शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या या तरतुदी देशाच्या विकासासाठी निर्णायक ठरू शकतात. सादर झालेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या अधिक संधी आणि आर्थिक सहकार्य मिळू शकते, जे भविष्यातील कुशल मनुष्यबळासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

**- कविता भोंगाळे- कदू-पाटील,** संचालिका, गायत्री ग्रुप ऑफ एज्युकेशन.



यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये अप्रत्यक्षपणे 12 लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे ज्येष्ठ नागरिकांसाठी टी.डी.एस. मर्यादा 50 हजारांवरुन 1 लाखपर्यंत वाढवली. आरोग्य क्षेत्राला मोठा दिलासा 36 जीवरक्षक औषधांवर कस्टम ड्युटी हटवली. शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्याचे काम देखील या अर्थसंकल्पामध्ये दिसते.किसान क्रेडिट कार्ड कर्जासाठी 5 लाखांची सीमा करण्यात आली आहे. राज्यांना पायाभूत सुविधांसाठी 1.5 लाख कोटींची मदत, 50 नवी पर्यटन स्थळे विकसित करणार.

**-नाना काटे,** माजी विरोधी पक्षनेता.



१२ लाख उत्पन्ना पर्यंत आयकर नाही ही नक्कीच स्वागतर्ह बाब आहे.उद्योजक व मध्यमवर्गीयांना लाभ होणार आहे.पण बारा लाखाच्या वर आयकर स्लॅब भरावा लागणार. ४ लाखापुढे आयकर भरावा लागणार ही स्लॅब पद्धत काढून टाकायला पाहिजे होती.एमएसएमई क्षेत्रासाठी क्रेडिट गॅरंटी स्कीमची मर्यादा ५ कोटी होती.ती दहा कोटी झाली आहे. याचा एमएसमईला मोठा फायदा होईल.क्रेडिट गॅरंटी स्कीमची स्टार्टअप साठी मर्यादा १० कोटी होती ती २० कोटी केल्यामुळे व स्टार्ट अप च्या सुविधा अजून पाच वर्षे चालू राहतील यामुळे स्टार्ट अप ला चालना मिळेल ५ लाख नवउद्योजिका महिलांना २ कोटी पर्यंत मुदत कर्ज मिळणार आहे.

**- संदीप बेलसरे**
अध्यक्ष, लघुउद्योग संघ



शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, शिक्षण, आरोग्य, सूक्ष्म आणि लघु उद्योग, स्टार्ट-अपसह उत्पादन क्षेत्रांसाठी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या लिथियम आयन बॅटरीच्या उत्पादनावर शुल्कात सूट दिली जाईल. त्यामुळे, इलेक्ट्रिक वाहनांची किंमत कमी होण्याची प्रबल शक्यता आहे. इलेक्ट्रिक वाहने बॅटरीवर चालतात. बॅटरी उत्पादनावर सूट मिळाल्यामुळे इलेक्ट्रिक वाहनांची किंमत कमी होऊ शकते. आयकर सीमा वाढवल्यामुळे त्या पैशांचा वापर अर्थव्यवस्थेत होईल आणि त्यामुळे मागणी वाढेल, म्हणूनच यावर्षीचा बजेट आशाजनक आहे.

**- सर्वेश शाह,** एमडी, ऑटोलाउंज ग्रुप.




# भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणांचे संकेत?

**भारत आणि चीन या दोन देशांमध्ये परस्पर संबंध प्रस्थापित झाले त्याला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. तसे पाहता दोन्ही देशांदरम्यान १९६२ मधील युद्धजखमांचे व्रण कायम आहेत. पाच वर्षांपूर्वी या जखमांवरील खपली गलवान संघर्षाच्या निमित्ताने निघाली आणि जखमेबरोबर संबंधही चिघळले.**

दोन अजस्र अर्थव्यवस्थांना सतत परस्परांशी युद्धाच्या छायेत राहणे परवडण्यासारखे नाही हे शहाणपण हळूहळू झिरपू लागले आहे. भारतीय परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी नुकताच बीजिंगचा दौरा केला आणि तेथील काही उच्चपदस्थांशी भेटीगाठी केल्या. चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी हे त्यांतील एक. या भेटीमध्ये अर्थातच बिगर-लष्करी संबंध सुरळीत करण्यावर चर्चा झाली. त्याअंतर्गत दोन देशांदरम्यान हवाई सेवा पूर्ववत करणे, व्हिसा तसेच इतर प्रक्रिया सुरळीत करणे आणि कैलाश-मानसरोवर यात्रेला (चीनकडून) परवानगी या मुद्द्यांवर मतैक्य झाले.



हे महत्त्वाचे, कारण परस्पर विश्वास वा अविश्वास केवळ सीमेवरील हालचाली आणि धोरणांवर अवलंबून नसतो. इंग्रजीत ज्यास 'ट्रॅक-टू डिप्लोमसी' असे संबोधले जाते तो समांतर संबंधांचा मार्गही अनुसरणे आवश्यक असते. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये बीजिंगला दिलेली भेट महत्त्वाची ठरली होती. त्यानंतर जवळपास तीन दशके भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा होत गेली. सीमावर्ती वादग्रस्त टापूंच्या बाबतीतही चर्चा सुरू राहिली. परंतु गेल्या दशकाच्या सुरुवातीस अध्यक्षपदी क्षी जिनपिंग विराजमान झाल्यानंतर चीनची नियत बदलली हे स्पष्टच आहे. कोविड – १९ मुळे परस्पर दळणवळणात खंड पडला, पण गलवान घुसखोरीमुळे संबंधांमध्येच नव्याने कटुता निर्माण झाली. हे संबंध आता कुठे स्थिरस्थावर होऊ लागले आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात देम्चोक आणि देपसांग या पूर्व लडाखमधील टापूंमध्ये गस्तीक्षेत्राबाबत मतैक्य झाल्यानंतर सैन्यमाघारीला वेग आला. सैन्यमाघारी ही गलवानपूर्व स्थितीपर्यंत झाली पाहिजे आणि त्यानंतर या संपूर्ण टापूचे निर्लष्करीकरण झाले पाहिजे अशी भारताची आग्रही मागणी आहे.

निर्लष्करीकरणाच्या दिशेने अद्याप फारशी प्रगती झालेली नाही. पण ती होत नाही तोवर इतर संबंध गोठलेले राहण्यात काहीच हशील नाही. चीनची 'भाषा' गेल्या वर्षभरात बदलली आहे हे नक्की. चिनी मालावर, विशेषत: विद्युत वाहनांवर घसघशीत आयातशुल्क आकारून युरोपने आपला वाहन उद्योग वाचवण्यासाठी पावले उचलली आहेत. युक्रेन युद्ध आणि बराच काळ रेंगाळलेली पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती यांमुळे पुरवठा शृंखला खंडित होऊन, व्यापारावर भर असलेली चिनी अर्थव्यवस्था मंदावू लागली आहे. हिमालयीन सीमेवर भारताने प्रत्युत्तर दिले तसेच प्रत्युत्तर सागरी सीमावर्ती भागांत तैवान आणि जपानच नव्हे, तर फिलिपिन्ससारखे छोटे देशही देऊ लागले आहेत. हे घडत असताना आता अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखी अत्यंत तऱ्हेवाईक व्यक्ती निवडून येणे याचीही दखल चीनला घ्यावीच लागत आहे. ज्या देशांविरुद्ध 'टॅरिफ-अस्त्र' वापरू अशी धमकी ट्रम्प वारंवार देत आहेत, त्यांत चीनचे नाव पहिल्या तीनमध्ये आहे! अशा परिस्थितीत भारताशी संबंध पूर्ववत करणे हे चीनसाठी राजकीय, आर्थिक दृष्टीने महत्त्वाचे ठरते.पण परिस्थितीचा फायदा उठवण्याची संधी भारतानेही दवडता कामा नये. सारे काही सुरळीत होत आहे असे वाटत असतानाच चीनकडून विश्वासघात होतो हा इतिहास फार जुना नाही. दोन्ही देशांमधील व्यापारी समीकरण भारताच्या दृष्टीने विसंगत, विपरीत आहे. चीनबरोबर आपली व्यापारी तूट आता १०० अब्ज डॉलर (अंदाजे ८६०० कोटी रुपये) इतकी प्रचंड आहे.

औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, विद्युत वाहने आदी उद्योगांसाठी चिनी उत्पादने आणि उपकरणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहेत. त्यांवरील अवलंबित्व पुढे महागात पडू शकते. कारण अलीकडे काही उपकरणांवर चीनने निर्बंध लादले, त्याचा फटका येथील उद्योजकांना बसलाच. दुसरीकडे, चिनी मालाला अमेरिका आणि युरोपने अटकाव केला तर भारत हीच मोठी आणि सक्षम बाजारपेठ आहे. पण त्या आधारावर आपला 'आवाज' वाढला पाहिजे.

## प्रासंगिक »

### नि कसचे काय!


***पुढील पाच वर्षे बिगरकृषी क्षेत्रात दरवर्षी साडेअठ्ठ्याहत्तर लाख रोजगार देऊन २०४७ पर्यंत दरवर्षी किमान आठ टक्के विकास दर राखल्यास देश 'मिडल इन्कम' म्हणवला जाईल...***

'कारखानदारीत (मॅन्युफॅक्चरिंग) चीन ही जगातील एकमेव महासत्ता आहे", असे प्रमाणपत्र देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन यांनीच खुद्द दिले ते उत्तम झाले. तेदेखील २०२५ चा अर्थसंकल्पपूर्व आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना. हा उल्लेख का आवश्यक त्याचे स्पष्टीकरण पुढे मिळेल; पण नागेश्वरन यांच्या या कबुलीमुळे 'भारत-चीन जगाचे सामुदायिक नेतृत्व करणार',नवी दिशा देईल' वगैरे भगतगणांच्या समाजमाध्यमी पोपटपंचीस आता विराम मिळेल. आर्थिक पाहणी अहवालाचा उल्लेख येथे आवर्जून केला कारण गेल्या वर्षी असाच आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना नागेश्वरन यांनी भारताच्या 'चीन प्लस वन' धोरणाची भली मोठी भलामण केली होती. म्हणजे त्यावेळी चीनमधून बाहेर पडत असणाऱ्या कंपन्या भारतात आपली कारखानदारी सुरू करतील, ही आशा.

जगाच्या पाठीवर अनेक महापुरुष होऊन गेले. त्यांचे जीवनचरित्र आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या आयुष्यातील प्रेरक प्रसंगांतून समाजात मूल्ये रुजवली गेली. ज्यांचा सकारात्मक परिणाम आजही जाणवतो. यामुळे त्यांनी सांगितलेली किंबहुना प्रत्यक्ष जगलेली मूल्ये हाच त्यांच्या आयुष्याचा अजरामर ठेवा आहे.

# गांधी केवळ संघविरोधासाठीच उरले आहेत?

समाजातील सर्व नागरिकांनी त्यांचे पालन करणे अभिप्रेत आहे, तर त्यांचे अनुयायी म्हणून घेणाऱ्यांनी ते व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात पाळलीच पाहिजेत. तरच त्या महापुरुषाच्या व त्यांनी मांडलेल्या विचारसरणीचा विजय झाला, असे म्हणता येईल. मात्र सद्यस्थितीत अनुयायी म्हणवून घेणे हे अनेकार्थांनी लाभदायी असल्याने अनुयायांचे पेव फुटले आहे, असेच म्हणता येईल. प्रत्यक्ष आचरणाची पूर्वअट मोडीत निघाल्याने अनुयायी म्हणून घेत व्यावहारिक लाभ मिळवण्याकडे कल आहे. याहून मोठे दुर्दैव म्हणजे अनुयायीपणाचा शिक्का मारून घेत महापुरुषांची मुल्ये सर्रास पायदळी तुडवली जातात. महात्मा गांधींच्याबाबतीत तर हे स्पष्टपणे जाणवते.महात्मा गांधी यांची हत्या सर्वार्थाने निषेधार्ह बाब होती. मात्र स्वतःच्या वैचारिक विरोधकांना झोडपण्यासाठी महात्मा गांधी



यांच्या हत्येचा आजही कसा उपयोग केला जातो याचे उत्तम उदाहरण म्हणजे इतिहासाचे अभ्यासक असे म्हणवणाऱ्या डॉ. राजेंद्र डोळके यांचा 'लोकसत्ता'मधील 'गांधीहत्या म्हणताच काय आठवते?' हा (३० जानेवारी) लेख. खरेतर हा प्रश्नाला उत्तर देण्यापेक्षा प्रतिप्रश्न केला जाऊ शकतो की, महात्मा गांधी यांचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्यांना फक्त ३० जानेवारीलाच महात्मा गांधी यांचे स्मरण का होते? त्यांच्या व्यक्तिगत किंवा सार्वजनिक आयुष्यात महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब का केला जात नाही? केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला झोडपण्यासाठी गांधीहत्येची घटना सातत्याने का वापरावी लागते?लेखात त्यांनी संघविरोधी परंपरेप्रमाणे गांधीहत्येसाठी संघ विचारसरणीला जबाबदार ठरवले आहे. यासाठी त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचे पत्रव्यवहार तसेच स्वामी विवेकानंद यांना हिंदू धर्मापासून तोडण्याचा चंग बांधलेले दत्तप्रसाद दाभोलकर यांच्या पुस्तकांचा आधार घेतला आहे. गांधीहत्या आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचा कुठलाही संबध नाही हे सांगणारी अनेक पुस्तके आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणातून अशा प्रकारचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्यावर न्यायालयात खटला चालू आहेमात्र गांधीहत्या झाल्यानंतर दंगल उसळावी आणि त्यात ब्राह्मण समाजाला लक्ष्य करण्यात यावे हा महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचा पराभव नव्हे का? डोळके यांनी त्यांच्या लेखात याबाबत एक शब्दही खर्च केला नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥


आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने

## नाम हाच भगवंताचा अवतार



आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. “सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो” असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की, सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे. आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्त्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळची परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्भावना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठिण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मांतले आहे. म्हणजे ‘जसा रोग तसे औषध’ किंवा ‘काट्याने काटा काढावा’ या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्याअर्थी कारण सूक्ष्मांतले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे. म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

**बोधवचन:- नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही.**



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**वक्फ बोर्डाच्या सुधारणा विधेयकाला विरोध करून उद्धव ठाकरे यांच्या गटाने पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार गुंडाळून काँग्रेसबरोबर जाणे एक वेळ मान्य झाले असते, पण आता सरसकट मुस्लिमांची बाजू घेऊन उद्धव ठाकरे यांची पावले पडत असतील, तर ते त्यांच्याच मतदारांना मान्य होणार नाही, हे कोणीही सांगेल. वक्फ बोर्डाचे सुधारणा विधेयक येत असताना उद्धव ठाकरे गटाच्या अरविंद सावंत यांनी त्या विधेयकाला विरोध केला,आणि हे कारण आता उबाठा गटाच्या ऱ्हासाला कारण ठरते की काय, असे वातावरण आहे, हे नक्की !**

# मुस्लिमांचे तुष्टीकरणच ‘उबाठा’ गटाला नडणार!



### गळती रोखणार कशी ?

कारणे कोणतीही असोत, उबाठा गटाच्या शिल्लक सेनेलाही गळती लागली आहे. त्यांच्या नऊ पैकी सहा खासदारांनी भाजपाचे उंबरठे झिजवणे सुरू केले आहे, तर अनेक आमदार, माजी आमदार एकनाथ शिंदे यांच्या दावणीला केव्हाच जाऊन उभे राहिले आहेत. एखादे पाऊल चुकीचे पडले, तर राजकारणात त्याचे किती खोलवर परिणाम भोगावे लागतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे उद्धव ठाकरे !

भाजपाशी युती तोडून काँग्रेसबरोबर आघाडी करणाऱ्या उद्धव ठाकरेंना त्यांचेच कार्यकर्ते एवढ्या लवकर धडा शिकवतील, असे वाटले नव्हते. पण, जाणाऱ्यांना जाऊ द्या, ते गद्दार आहेत, पैसे घेऊन फुटतात, अशी उद्धव ठाकरेंची समजूत घालणाऱ्या संजय राऊत आणि सुषमा अंधारे सारख्यांवर विसंबून राहिले, की अवदसा ही मागे लागणारच, याचा छोटासा अंदाजही उद्धव ठाकरेंना लागला नाही..आणि लागला असला तरी त्यांची सुधारण्याची वृत्ती दिसत नाही, असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल.

### हट्टीपणा, मस्तवालपणा एकमेव कारण..

उद्धव ठाकरेंच्या गटाची ही अवस्था होण्यास खरे म्हणजे एकनाथ शिंदे फुटले त्या दिवशी सुरुवात झाली. पण, हट्टीपणा सोडायचा नाही आणि मस्तवालपणे इतरांवर तोंडसुख घ्यायचे, ही वृत्ती त्यांना रसातळाला घेऊन निघाली आहे. सुरुवातीला काही खासदार गेले, नंतर आमदार गेले.. आता पुन्हा खासदार आणि माजी आमदारांची रांग एकनाथ शिंदे आणि भाजपाच्या दरवाजात उभी आहे, तरीही अजून उद्धव ठाकरे यांच्या प्रवक्त्यांची तोंडे गप्प होत नाहीत, हा आता शुद्ध मूर्खपणाच म्हणावा लागेल.

राजकारणात सतत सतर्क राहावे लागते आणि त्या अनुषंगाने पावले टाकावी लागतात, हे या शिल्लक गटाला कोणी सांगावे? पण, स्वतःच्या मस्तीत वावरत असताना, वंदनीय बाळासाहेबांच्या कर्तृत्वावर मते मागण्याचे दिवस संपले, हे देखील यांच्या लक्षात येत नाही. काहीही न करता, जनतेपुढे कोणताही दृष्टिकोन न ठेवता केवळ भाजपा आणि एकनाथ शिंदे यांना शिवीगाळ करून, टोमणे मारून मते कशी मिळणार? याचे उत्तर फक्त उद्धव ठाकरेच देऊ शकतात. बरं, यांच्या हेकटपणाला आणि हट्टीपणाला त्यांचा मित्र असणारा शरद पवार यांचा गट, काँग्रेस पक्षही कंटाळला आहे, हे सुद्धा यांच्या लक्षात येत नाही, ही खरी दुर्दैवाची बाब !

### अनेकांचा ‘उबाठा’ ला जय महाराष्ट्र..

या सर्व पार्श्वभूमीवर आता ठाकरे गटाला खिंडार, अखेर शिंदेंचं ऑपरेशन टायगर यशस्वी.. अशा आशयाच्या बातम्या झळकू लागल्या आहेत. प्रचंड बहुमत घेऊन जिंकलेले ‘महायुती’ चे सरकार स्थापन झाले असून आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनिती आखली जात आहे. त्या दृष्टीने राजकीय पक्ष कामाला लागल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे मुंबईत ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिला, तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटही अधिक्र सक्रीय होऊन ठाकरे गटाला धक्का देत आहे. काँग्रेस आणि ठाकरे गटातील पदाधिकारी आपल्या पक्षात घेण्याची स्पर्धाच ‘महायुती’ मध्ये सुरू झाल्याचे दिसून येत आहे. मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी ‘ऑपरेशन टायगर’ संदर्भात भाष्य करताना काही माजी आमदार व खासदार आमच्या संपर्कात असून लवकरच त्यांचा शिवसेनेत प्रवेश होईल, असे म्हटले होते. त्यानुसार आता पडद्यामागून शिवसेनेचे ऑपरेशन टायगर सुरू असल्याची चर्चा सुरू असून अनेक माजी आमदारांचा लवकरच शिवसेनेत प्रवेश होणार आहे. काँग्रेसचे माजी आमदार रविंद्र धंगेकर हेही धनुष्यबाण हाती घेणार आहेत, असेही धक्कादायक वृत्त आहे.

### उद्धव ठाकरेंचे खासदारही फुटणार

उद्धव ठाकरे यांच्या खासदारांपैकी सहा जण फुटणार असल्याचे बोलले जाते. पक्षांतर विरोधी कायदा लागू पडू नये, म्हणून दोन तृतीयांश म्हणजेच नऊ पैकी सहा खासदार हे भाजपा किंवा एकनाथ शिंदे यांच्या हाताला लागल्याचे सांगण्यात येते.

उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली पाच माजी आमदारांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश होणार आहे. काही दिवसांपूर्वी ठाकरेंच्या शिवसेना बैठकीत नाराज होऊन उठून गेलेले चंद्रकांत मोकाटेही ठाकरेंची साथ सोडणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे माजी आमदार धंगेकर व हुसेन दलवाई यांनी मुक्तागिरी बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची भेट घेतली आहे.

### गुलाल तिकडे चांगभले..

केंद्रामध्ये नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांची सरकारे ही चांगल्याच बहुमताने सत्तेवर आलेली असल्यामुळे पुढील पाच वर्षे हलणार नाहीत. मग विरोधी पक्षांमध्ये बसून पाच वर्षे करायचे काय, हा प्रश्न बहुतेकांच्या पुढे पडला असणार, विरोध करावा तर विकासकामे कशी होणार, हा प्रश्न बहुतेकांना भेडसावत असणार आणि त्यातूनच राम राम ठोकण्याचे हे सत्र सुरू झाले असणार !

भारतीय जनता पक्ष हा एकमेव पक्ष असा आहे, ज्याचे लोकप्रतिनिधी पाच वर्षे विरोधी बाकावर सुद्धा बसू शकतात, आणि मतदारांचा कौल मागण्यासाठी नव्याने फिरू शकतात. पण, सत्तेला चटावलेल्यांना , वाटेल ते करून सत्ता हवी असते, थोडा देखील दम ते काढू शकत नाहीत.. हेच तत्व उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राला दाखवून दिले आणि आपल्या कार्यकर्त्यांना उघडून सांगितले. जे त्यांनी पेरले तेच आता उगवते आहे, चला, यालाच म्हणू या गुलाल तिकडे चांगभले !

# महाराष्ट्रासाठी काय?



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज (१ फेब्रुवारी) अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात वेगवेगळ्या क्षेत्रासाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे.**

लघू उद्योगासह विविध क्षेत्रासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.काँग्रेसचे नेत्यांनी अर्थसंकल्पात महाराष्ट्राची निराशा करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. यादरम्यान राज्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी का देण्याच आलं? याची माहिती दिली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या वाट्याल अर्थसंकल्पात काय आलं याची माहिती देण्यात आली आहे.र्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. मध्यम वर्गाने या निर्णयाचे स्वागत केले असताना आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे. ते म्हणाले, "देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

## भारताला सबळ करणारा अर्थसंकल्प

देशाचे लोकप्रिय आणि कर्तृत्ववान पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी विकसित भारताचं पाहिलेलं स्वप्न प्रत्यक्षात येणार, याची खात्री देणारा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. अर्थसंकल्पात सामान्य नोकरदार वर्गाला जो दिलासा मिळालाय, त्याचं वर्णन अभूतपूर्व असंच करावं लागेल. 12 लाखापर्यंतच्या उत्पन्नावर संपूर्ण करमुक्ती मिळाल्याने घराघरात लक्ष्मीच्या पाऊलखुणा उमटल्या असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये त्यांनी विविध घोषमा केल्या आहेत. हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांना दिलासा देणारा असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. 12 लाखापर्यंतच्या उत्पन्नावर



संपूर्ण करमुक्ती मिळाल्याने आता घराघरात लक्ष्मीची पावलं उमटल्याशिवाय राहणार नाहीत असे एकनाथ शिंदे म्हणाले. एक सर्वांगसुंदर, आत्मनिर्भर भारताला सबळ करणारा हा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो, आणि महाराष्ट्रातल्या तमाम नोकरदारांतर्फे त्यांचे आभारी मानतो असे एकनाथ शिंदे म्हणाअर्थसंकल्पातील कल्पक तरतुदींचा लाभ होणार असल्याने देशाच्या प्रगतीचा आलेख अधिकाधिक उंचावत जाणार यात शंकाच नाही असेही एकनाथ शिंदे म्हणाले. हा सशक्त भारताचा रोडमॅप आदुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्यांना मदत करण्यासाठी 36 जीवनरक्षक औषधांना मूलभूत सीमाशुल्कातून पूर्णपणे सूट देण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी दिली आहे. या सोबतच कॅन्सर हॉस्पिटलमध्ये डे-केअर सुरू करण्यात येणार असल्याचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन सांगितले. जेणेकरून कर्करोगाच्या रुग्णांना विशेष काळजी घेता येईल.



## आवळा' देऊन 'कोहळा' काढण्याचा प्रकार

"देशातील शेतकरी गंभीर संकटाचा सामना करत आहे. आपल्या श्रमाच्या योग्य मोबदल्यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरून हमीभावाची मागणी करत आहेत, मात्र केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात साधा उल्लेखही नाही. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या



आत्महत्या सातत्याने वाढत असताना आणि कर्जमाफीची जोरदार मागणी होत असतानाही, भाजप सरकारने कोणतीही ठोस घोषणा केली नाही. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाखांवरून पाच लाखांपर्यंत वाढवली असली, तरी त्याचा शेतकऱ्यांना फारसा फायदा होणार नाही. उलट, ग्रामीण भागातील गरीब आणि मजुरांना आधार देणाऱ्या मनरेगा योजनेसाठी तरतूदीत कपात करून सरकारने त्यांच्यावर आणखी संकट ओढवले आहे. एकूणच 'आवळा' देऊन 'कोहळा' काढण्याचा प्रकार या अर्थसंकल्पातून दिसून येतो!", अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली आहे.

## दिलासा देण्याची गरज : शरद पवार

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण या आज देशाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. महागाई कमी करण्यासाठी आणि आयकरात सवलत देण्याबाबत



सरकारकडून मोठ्या घोषणा केल्या जातील अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, देशातील जनतेसह विरोधी पक्षांनी केंद्र सरकारकडे, प्रामुख्याने अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडे काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाने देखील पाच महत्त्वाच्या मागण्यांकडे सर्वांचं लक्ष वेधलं आहे.

## पेट्रोल-डिझेल होणार का स्वस्त?



शेतकरी, महिला, युवक, गरीब वर्गासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. महिलांच्या कौशल्याविकास प्राथम्याचा विषय आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेंतर्गत शेती उत्पादकता वाढ, शेतमाल साठवणूक सुविधा, सिंचन आणि क्रेडीट सुविधांवर भर देण्यात येणार असून शंभर जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. कापूस आणि डाळींच्या उत्पादनवाढीसंदर्भात घेतलेले निर्णयही महाराष्ट्राच्या फायद्याचे आहेत. किसान क्रेडीट कार्डची मर्यादा ५ लाख करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. देशाला जगाचे फूड बास्केट बनवण्यात महाराष्ट्राची भूमिका प्रमुख असेल", असेही अजित पवार म्हणाले.मी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घेतलेल्या निर्णयांचं स्वागत करतो.

## आमची घोर निराशा केली

आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात वेगवेगळ्या क्षेत्रासांठी अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांसाठी मोठा दिलासा देण्यता आला आहे. त्याबरोबर शिक्षण,



शेती, रोजगार, उत्पादन, लघू उद्योगासह विविध क्षेत्रासाठी महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या. मात्र, या अर्थसंकल्पावर विरोधकांनी जरोदार टीका केली आहे. काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या अर्थसंकल्पाबाबत सविस्तर भूमिका मांडली आहे.र्थसंकल्पामुळे आमची घोर निराशा झाली, असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

# बळ देणारा अर्थसंकल्प!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून अर्थसंकल्पाचं कौतुक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शुक्रवारी लोकसभेत २०२५ चा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पातून आयकर भरणाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. दरमहा १ लाख रुपये कमावणाऱ्या व्यक्तीलाही कर भरावा लागणार नाही, म्हणजे आता १२.७५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही. तसेच तुम्ही आता मागील ४ वर्षांचे आयटी रिटर्न एकत्र दाखल करू शकाल, या घोषणेनंतर आता मध्यमवर्गीयांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपला आनंद व्यक्त केला आहे. काहींनी मीम्सच्या माध्यमातून आपला आनंद व्यक्त केला आहे.**

नवीन करप्रणालीनुसार प्राप्तीकराच्या टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. नव्या करप्रणालीनुसार १२ लाखांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कुठलाही कर लागणार नाही असं जाहीर करण्यात आलं आहे. ही या अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा आहे यात शंकाच नाही.अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, पुढील आठवड्यात नवीन प्राप्तीकर विधेयक आणले जाईल. आम्ही निर्यात क्षेत्रात योजना सुरू करू. एमएसएमईंना परदेशात टॅरिफ सहाय्य मिळेल. पुढील आठवड्यात नवीन विधेयक आणले जाईल. विमा क्षेत्रासाठी एफडीआय मर्यादा वाढवणार आहे अशाही घोषणा त्यांनी केल्या. करदात्यांना दिलासा आणि शेतकरी, तसंच वृद्धांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प होता असंच म्हणता येईल.याव्यतिरिक्त, ईव्ही बॅटरी उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या ३५ वस्तू आणि मोबाइल फोन बॅटरी उत्पादनासाठी २८ वस्तू शुल्कमुक्त करण्यात आल्या आहेत. याचा अर्थ कंपन्या आता बॅटरी उत्पादनासाठी आवश्यक मशीन्स आणि टूल्स अतिरिक्त शुल्काशिवाय आयात करू शकतात. मोठ्या कंपन्यांना भारतात त्यांच्या उत्पादनाचे विस्तार करण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे. या बदलांमुळे ईव्ही बॅटरी स्वस्त होऊ शकतात, ज्यामुळे ग्राहकांसाठी इलेक्ट्रिक वाहने अधिक स्वस्त दरात खरेदी करता येतील. कमी उत्पादन खर्चामुळे देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळेल, विविध नोकऱ्या निर्माण होतील आणि चीनसारख्या देशांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी होईल.




### वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था


केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत अर्थसंकल्प सादर केला आहे. "आपली अर्थव्यवस्था सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी आहे. गेल्या १० वर्षांतील आपला विकासाचा ट्रॅक रेकॉर्ड आणि संरचनात्मक सुधारणांनी जगाचे लक्ष वेधले आहे. या काळात भारताच्या क्षमतेवरील विश्वास वाढला. पुढील ५ वर्षे सर्वांचा विकास साध्य करण्यासाठी या अर्थसंकल्पाकडे आपण पाहतो आहेत, असं यावेळी सीतारमण म्हणाल्या.

## राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात विविध क्षेत्रासाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलं आहे. या बरोबरच शिक्षण, शेती, रोजगार, उत्पादन, लघू उद्योगासह विविध क्षेत्रासांठी महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक देखील केलं आहे. मात्र, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या अर्थसंकल्पावरून केंद्र सरकारवर खोचक टीका केली आहे. "बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमांवर ही मलमपट्टी आहे", अशा शब्दांत राहुल गांधींनी हल्लाबोल केला आहे.बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमांवर ही मलमपट्टी करण्यात आली आहे.जागतिक अनिश्चिततेच्या काळात आपल्या आर्थिक संकटाचे निराकरण करण्यासाठी एक आदर्श बदल करणं आवश्यक होतं. पण हे सरकार विचारांनी दिवाळखोर आहे", असा हल्लाबोल राहुल गांधींनी अर्थसंकल्पावर बोलताना केला. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे.काँग्रेसचे नेते केसी वेणुगोपाल यांनीही अर्थसंकल्पावरून केंद्र सरकारवर टीका केली. केसी वेणुगोपाल यांनी म्हटलं की, "भारताची ढासळलेली अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी हा अर्थसंकल्प काहीही करणार नाही. सरकारने समाजातील गरीब आणि उपेक्षित घटकांसाठी कोणताही दिलासा दिलेला नाही. फक्त पोकळ घोषणा केल्या आहेत. तसेच फक्त पोकळ घोषणा देऊन जनतेची फसवणूक करण्याचा हा प्रयत्न केला आहे", असं केसी वेणुगोपाल यांनी म्हटलं आहे.



# अर्थसंकल्प




## संरक्षण क्षेत्रासाठी सर्वाधिक तरतूद

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मोदी सरकारचा तिसरा अर्थसंकल्प सादर केला. मध्यमवर्गीयांना १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नात कर सवलत दिल्यानंतर भाजपाकडून हा सामान्यांचा अर्थसंकल्प असल्याचे म्हटले आहे. मध्यम वर्गावरील प्रत्यक्ष कराचा बोजा कमी केल्यामुळे सरकारला एक लाख कोटींचा भुर्दंड बसणार आहे. असे असले तरी अर्थसंकल्पातून विविध क्षेत्राला निधीची तरतूद केली आहे. संरक्षण क्षेत्राला ४,९१,७३२ एवढी तरतूद करण्यात आली आहे.याशिवाय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी टीडीएस पेमेंटमध्ये उशीर होण्याला गुन्ह्याच्या क्षेत्रातून हटविले आहे. याचा अर्थ एखादा व्यक्ती किंवा कंपनीने वेळेवर टीडीएस भरला नाही, पण जर त्याने ठरलेल्या वेळेत विवरण पत्र दाखल केले असेल तर त्याला गुन्हा मानले जाणार नाही.

# सचिन तेंडुलकरला जीवनगौरव!

## बुमराह ठरला सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू पुरस्काराचा मानकरी

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारताचा मास्टर ब्लास्टर खेळाडू सचिन तेंडुलकरचा मोठ्या पुरस्काराने गौरव केला आहे. १ फेब्रुवारी रोजी मुंबईत बीसीसीआयच्या नमन पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने बीसीसीआयने मास्टर ब्लास्टरला कर्नल सीके नायडू जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे.**





सचिन तेंडुलकरला आयसीसीचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष जय शाह यांच्याकडून हा खास पुरस्कार प्रदान करण्यात आला. सचिन तेंडुलकरला हा खास पुरस्कार देताना सर्व उपस्थितांनी उभं राहून सचिन तेंडुलकरचं कौतुक केलं. याशिवाय बीसीसीआयने सचिनसाठी एक खास व्हीडिओदेखील तयार केला होता. जो पुरस्कार प्रदान करण्यापूर्वी दाखवण्यात आला. भारतासाठी २०० कसोटी सामने खेळणाऱ्या सचिन तेंडुलकरने तिन्ही फॉरमॅटमध्ये अमूल्य योगदान दिले आहे. २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतही सचिनने भारतासाठी चमकदार कामगिरी केली आणि अनेक संस्मरणीय खेळी खेळल्या. १९८९ मध्ये भारताकडून पदार्पण करणाऱ्या सचिनने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०१३ मध्ये खेळला.

सचिनने जवळपास २५ वर्षे भारतीय क्रिकेटसाठी योगदान दिले आहे. दरम्यान सचिन तेंडुलकरने अनेक अद्वितीय कामगिरी करत मोठमोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत.आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे.

याचबरोबर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतकं झळकावणारा सचिन तेंडुलकर हा एकमेव क्रिकेटपटू आहे. हे आणि असे अगणित विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहेत.भारतासाठी, सचिनने २०० कसोटी सामन्यांमध्ये ५३.७८ च्या उत्कृष्ट सरासरीने १५९२१ धावा केल्या आहेत आणि ५१ शतकं झळकावली आहेत, तर ४६३ एकदिवसीय सामने खेळलेल्या या माजी अनुभवी खेळाडूने ४४.८३ च्या सरासरीने १८४२६ धावा केल्या आहेत. याशिवाय ४९ शतकंही केली आहेत. सचिनने भारतासाठी १ टी-२० सामना खेळला असून त्यात १० धावा केल्या.भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने सामन्यांमध्ये भेदक गोलंदाजी करत भारतासाठी अनेक सामने जिंकले आहेत. बुमराहने प्रत्येक फॉरमॅटमध्ये चमत्कार करत सामन्याचा रोख बदलला. त्याला भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मोठ्या पुरस्काराने सन्मानित केले आहे. बुमराहची सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून निवड झाली आहे. त्याला पॉली उमरीगर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.बुमराहची २०२३-२४ या वर्षासाठी सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून निवड करण्यात आली आहे. बुमराहने आतापर्यंत टीम इंडियासाठी कसोटीत २०५ विकेट्स घेतल्या आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याने १४९ विकेट घेतल्या आहेत. बुमराहने आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ८९ विकेट घेतल्या आहेत. त्याने आयसीसीच्या मोठ्या स्पर्धांमध्ये टीम इंडियासाठी चमकदार कामगिरी केली आहे. नुकताच बुमराहला आयसीसीचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू २०२४ चा पुरस्कारही मिळाला.पॉली उमरीगर पुरस्कार बीसीसीआयच्या सर्वात मोठ्या पुरस्कारांच्या यादीत समाविष्ट आहे.

### बुमराहने 205 विकेट्स घेतल्या

या पुरस्कारासह बीसीसीआय रोख बक्षीसाची रक्कमही देते. विजेत्या खेळाडूला या विजेतेपदासाठी १५ लाख रुपयांचे बक्षीस मिळाले आहे. बुमराहला तिसऱ्यांदा पॉली उमरीगर विजेतेपद मिळाले आहे. २०१८-१९ हंगामासाठी त्याला हे विजेतेपद मिळाले होते. यानंतर २०२१-२२ मध्येही तो या पुरस्काराचा मानकरी ठरला होता. तर शुबमन गिलला २०२२-२३ हंगामासाठी पॉली उमरीगर पुरस्कार देण्यात आला होता.जसप्रीत बुमराहसह स्मृती मानधनाला महिला सर्वात्कृष्ट आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूचा पुरस्कार देण्यात आला आहे. याबरोबरच रवीचंद्रन अश्विनला त्याच्या उत्कृष्ट कारकिर्दीसाठी बीसीसीआयचा स्पेशल अवॉर्ड देण्यात आला. तर देशांतर्गत क्रिकेटपटूंनाही त्यांच्या कामगिरीसाठी अनेक पुरस्कार देण्यात आले आहेत..बुमराहची २०२३-२४ या वर्षासाठी सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून निवड करण्यात आली आहे. बुमराहने आतापर्यंत टीम इंडियासाठी कसोटीत २०५ विकेट्स घेतल्या आहेत.

# ऑस्ट्रेलियाचा २३ वर्षांनंतर ऐतिहासिक विजय!

## कसोटी क्रिकेटमध्ये नोंदवला तिसरा सर्वात मोठा विजय

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाने श्रीलंका दौऱ्याची सुरुवात विजयाने केली आहे. शनिवारी गॅले येथील पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने यजमान श्रीलंकेचा एक डाव आणि २४२ धावांनी दारुण पराभव केला. ऑस्ट्रेलियाने गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्ही विभागात दमदार प्रदर्शन केले आहे. विशेष म्हणजे ऑस्ट्रेलियाचा हा परदेशी भूमीवर तिसरा सर्वात मोठा विजय ठरला आहे.**




या सामन्यात ऑस्ट्रेलियाने आपला पहिला डाव ६ बाद ६५४ धावांवर घोषित केला होता. प्रत्युत्तरात श्रीलंकेला पहिल्या डावात १६५ आणि दुसऱ्या डावात २४७ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाने कसोटी क्रिकेटमध्ये परदेशी भूमीवर तिसरा सर्वात मोठा विजय नोंदवण्याचा विक्रम केला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा ऑस्ट्रेलियाचा चौथा सर्वात मोठा विजय आहे. २३ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियन संघाने २०० हून अधिक धावा आणि डावांच्या फरकाने कसोटी सामना जिंकला आहे. दक्षिण आफ्रिकेचा घरच्या मैदानावर ३६० धावा आणि एका डावाच्या फरकाने पराभव केला होता.ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी पहिल्या दिवसापासून श्रीलंकेच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. ऑस्ट्रेलियाचा सलामीचा फलंदाज उस्मान ख्वाजाने शानदार द्विशतक झळकावले. ख्वाजाने २३२ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली, ज्यात त्याने १६ चौकार आणि १ षटकार मारला. याशिवाय कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि पदार्पणवीर जोश इंग्लिसने शतकं झळकावण्याचा पराक्रम केला स्मिथने १४१ आणि इंग्लिसने १०१ धावांचे योगदान दिले.अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाने आपला पहिला डाव ६५४/६ धावांवर घोषित केला. या प्रचंड धावसंख्येच्या प्रत्युत्तरात श्रीलंकेचा पहिला डाव अवघ्या १६५ धावांत आटोपला.

### ऑस्ट्रेलियाचा चौथा सर्वात मोठा विजय

दुसऱ्या डावातही श्रीलंकेला केवळ २४७ धावा करता आल्या आणि ऑस्ट्रेलियाने पहिली कसोटी एक डाव आणि २४२ धावांनी जिंकली.प्रत्युत्तरात श्रीलंकेला पहिल्या डावात १६५ आणि दुसऱ्या डावात २४७ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाने कसोटी क्रिकेटमध्ये परदेशी भूमीवर तिसरा सर्वात मोठा विजय नोंदवण्याचा विक्रम केला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा ऑस्ट्रेलियाचा चौथा सर्वात मोठा विजय आहे. २३ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियन संघाने २०० हून अधिक धावा आणि डावांच्या फरकाने कसोटी सामना जिंकला आहे.

## खासदारांना शोधून देईल त्याचा करणार सत्कार!

# शिरुरचे खासदार अमोल कोल्हे हरवले आहेत का?

### कुदळवाडी बुलडोझर प्रकरण : मुस्लिम समाजाच्या नेत्या रुहिनाज शेख यांचे ‘चॅलेंज’

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिखली-कुदळवाडी परिसरातील अनधिकृत बांधकाम आणि भंगार व्यावसायिकांच्या दुकानांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण कारवाई सुरू केली. त्याला या भागातील व्यापारी आणि मुस्लिम बांधवांनी विरोध केला. मोठ्या प्रमाणात नागरिक रस्त्यावर उतरले. अखेर प्रशासनाला सदर कारवाई थांबवावी लागली.**



कुदळवाडी-चिखली भागातील भंगार दुकानांमध्ये लागलेल्या आगीच्या घटनांच्या पाश्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने गेल्या काही दिवसांपासून अतिक्रमण कारवाई सुरू केली आहे. याबाबत भाजपाचे हिंदूत्ववादी नेते आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा सभागृहात कारवाईची मागणी केली होती. या भागात बांगलादेशी आणि रोहिग्यांचे बेकादेशीर वास्तव्य असल्याचा दावा केला होता. त्यामुळे प्रशासनाने कारवाई तीव्र केली.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने अनधिकृत मालमत्ताधारक आणि बेकायदा भंगार व्यावसायिकांना कारवाई करण्याबाबत नोटीस दिली. त्यानंतर गुरूवारी मोठ्या फौजफाट्यासह कारवाई सुरु केली. मात्र, मोठ्या प्रमाणात जमाव रस्त्यावर उतरला आणि प्रशासनाला कारवाई स्थगीत करावी लागली. मुस्लिम समाजाच्या नेत्या रुहिनाज शेख यांनी विशिष्ट समाजाला ‘टार्गेट’ करण्यासाठी केलेल्या या कारवाईवर तीव्र शब्दांमध्ये टीका केली आहे. या कारवाईला विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरुन शेख यांनी आंदोलन उभा केले. त्याला यश मिळाले आणि व्यापाऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

#### कुदळवाडीतील कारवाईला धार्मिक रंग...

भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी बांगलादेशी आणि रोहिग्यांचा मुद्दा उपस्थित करीत कुदळवाडी-चिखली परिसरातील अतिक्रमण कारवाईला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक, तशी परिस्थिती नाही. सदर बांधकामे नियमित करता येतील. पण, लांडगे यांना ही कारवाई करुन आपण एका विशिष्ट समाजाला ‘टार्गेट’ करीत आहोत, असे चित्र उभा करायचे आहे. कारण, त्यांना विधानसभा निवडणुकीमध्ये या भागातून मतदान कमी झालेले आहे. मात्र, ही कारवाई केवळ मुस्लिम बांधवांवर नाही, तर सर्वच धर्मीयांच्या बांधकामांवर होणार आहे. सदर कारवाई अन्यायकारक आहे, अशी भूमिका रुहिनाज शेख यांनी ‘महाईन्यूज’शी बोलताना व्यक्त केली.

#### खा. कोल्हे, अजित गव्हाणे फिरकले नाहीत...

कुदळवाडी- चिखली भागातील नागरिकांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर विश्वास ठेवून मतदान केले. मध्यंतरी आगीची घटना झाल्यानंतर अतिक्रमण कारवाई झाली. त्यावेळी डॉ. कोल्हे प्रत्यक्ष भेट देणार होते. आता गेल्या काही दिवसांपासून कारवाई सुरू आहे. पण, डॉ. कोल्हे नागरिकांनी मागणी करुनही या ठिकाणी फिरकले नाहीत. दुसरीकडे, विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अजित गव्हाणे यांना आमच्या लोकांनी मतदान केले. ही नेते मंडळी पुरोगामी विचाराच्या बढाया मारतात. पण, आता त्यांना कारवाई दिसत नाही का? असा प्रश्न आहे. “खासदार कोल्हे साहेब कुठेतरी हरवले आहे. शोधणाऱ्याला योग्य तो सन्मान देण्यात येईल..” अशी टीकाही रुहिनाज शेख यांनी सोशल मीडियावर जाहीरपणे केली आहे.

---

## स्त्रियांवरील अन्याय रोखण्यासाठी न्यायव्यवस्थेचा सुलभ वापर गरजेचा – डॉ. नीलम गोऱ्हे

### अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलिसांच्या कार्यपद्धतीत सुधारणा हवी – कायदेतज्ज्ञ ॲड. उज्वल निकम

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**तिसरे विश्व मराठी संमेलन २०२५ उत्साहात सुरू असून, आज दुसऱ्या दिवशी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. उज्वल निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महिला कायदा व महिलांना मराठी भाषेत न्याय या विषयावर दोन विशेष परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. ॲड. अनुराधा परदेशी यांनी त्यांची मुलाखत घेतली. या परिसंवादात महिला सक्षमीकरण कायद्याची अंमलबजावणी आणि न्यायप्रक्रिया सुधारणा यावर सखोल चर्चा झाली.**




यावेळी बोलताना डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, “न्याय मिळवण्यासाठी स्त्रियांना मोठा संघर्ष करावा लागतो. कोर्टाच्या पायऱ्या चढताना वकील, न्यायाधीश, कायदेतज्ज्ञ यांची मदत मिळत असली तरी न्यायप्रक्रिया सामान्य नागरिकांसाठी अधिक सुलभ करणे गरजेचे आहे. विशेषतः मराठी भाषेत कायद्याची प्रक्रिया सोपी करण्याची तातडीची गरज आहे.” त्या पुढे म्हणाल्या, “स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा, लैंगिक शोषण यासंदर्भात न्यायालयात तक्रार नोंदवणे सोपे व्हावे यासाठी कायदेशीर शब्दांकन हे सरळ, स्पष्ट आणि मराठीत असावे. अनेक वेळा पीडित महिलांना पोलीस ठाण्यात जबाब नोंदवताना अडचणी येतात, कारण कायदेशीर कागदपत्रे क्लिष्ट आणि इंग्रजीत असतात. त्यामुळे न्यायालयीन निर्णयांची अधिकृत भाषांतरे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.”

#### अत्याचाराच्या घटनांमध्ये पोलिसांच्या कार्यपद्धतीत सुधारणा हवी – कायदेतज्ज्ञ ॲड. उज्वल निकम

ज्येष्ठ कायदे तज्ञ ॲड. उज्वल निकम यांनी महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांवर भाष्य करताना पोलिसांच्या कार्यपद्धतीतील त्रुटींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, “अनेक वेळा पीडित महिलांना पोलीस ठाण्यात जावेसे वाटत नाही, कारण त्यांना वाटते की त्यांचीच चूक आहे. समाजातील मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. तसेच, पोलीस जबाब घेताना पीडितेची मानसिक स्थिती समजून घेतली पाहिजे आणि तिच्यावर अनावश्यक दबाव येणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.”

त्यांनी मराठी भाषेत न्यायालयीन प्रक्रिया सोपी करण्याची गरजही अधोरेखित केली. तसेच, “महिलांनी योग्य मार्गाने न्याय मिळवण्यासाठी पुढे आले पाहिजे आणि त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी अधिक संवेदनशीलता दाखवली पाहिजे,” असे मत त्यांनी व्यक्त केले.

#### मराठी भाषेतील कायदे समजण्यास सोपे करण्याची मागणी

परिसंवाददरम्यान, मराठीतून कायद्याची माहिती अधिक सहजसोप्या भाषेत उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे मत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मांडले. न्यायव्यवस्थेतील अधिकृत भाषांतर यंत्रणा सक्षम करणे, अधिकृत मराठी अनुवादकांची संख्या वाढवणे, तसेच पोलीस ठाण्यात व न्यायालयात मराठीतून कामकाज करण्यावर भर द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

पुढे बोलताना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सुचवले की, महाराष्ट्र सरकारने मराठी भाषेतील न्यायव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष धोरण तयार करावे. न्यायालयीन निर्णयांची मराठीत अधिकृत भाषांतरे लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावीत आणि सामान्य नागरिकांना न्यायप्रक्रियेची माहिती त्यांच्या मातृभाषेत समजावून सांगण्यासाठी प्रयत्न करावेत. या परिसंवादामुळे मराठी भाषेतील न्यायसंस्थेच्या सक्षमीकरणाचा मुद्दा अधिक चर्चेत आला असून, पुढील काळात यावर ठोस निर्णय घेण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046